## पालक

मूल निरीक्षणातून, अनुभवातून, अनुकरणातून शिकत असते. पालक हे विद्यार्थ्यांचे घरचे शिक्षक असतात. विद्यार्थ्याला वळण लावण्याच्या बाबतीत शिक्षक व पालक एकाचवेळी जबाबदारी पेलत असतात. याप्रकारे शाळा आणि घर हे दोन्हीही घटक मूल्यवर्धन कार्यक्रमात प्रभावी भूमिका वठवू शकतात.

शाळेच्या एका विशिष्ट वातावरणात जेव्हा मुले ज्ञान, कौशल्ये व मूल्ये शोषून घेत असतात, तेव्हा घरात असू शकणारे विसंगत वातावरण, मुलांना संभ्रमात टाकणारे ठरू शकते. उदा. मुलांना पान, तंबाखू, गुटखा, बिडी, सिगारेट, दारू इत्यादी व्यसनांचे परिणाम, खोटे बोलण्याचे परिणाम इत्यादी विषयांवर भरपूर चर्चा करण्याची संधी शाळेत दिली जाते. घरी मुलांना याविरूद्ध गोष्टी पहायला, अनुभवायला मिळाल्या तर शाळेत शिकलेले खरे की आपल्या घरात दिसते ते खरे, असा संभ्रम त्यांच्या मनात निर्माण होऊ शकतो. या बाबी लक्षात घेऊन मुलांच्या समोर आपण काही गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत. एकमेकांचा आदर करणे, मदत करणे, एकमेकांची विशेषतः वृद्धांची काळजी घेणे, प्राणीमात्रांवर प्रेम करणे, पाणी–वीज या साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर करणे इत्यादी सकारात्मक गोष्टी घरी आणि शाळेत एकाच वेळी दिसायला हव्यात.

मूल्यवर्धन कार्यक्रम नेमका काय आहे, तो कसा चालतो, त्याने विद्यार्थ्यांच्या वागणुकीत कसा बदल होतो, हे सारे पालकांनी आपणहून समजून घ्यायला हवे. आपल्या मुलांकडे ह्या कार्यक्रमाविषयी चौकशी करीत राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांना दिलेल्या घरी करायच्या कृतीला योग्य प्रतिसाद दिला पाहिजे.









## समग्र शाळा दृष्टिकोनात शिकण्याची आनंददायी प्रक्रिया

मूल्याधारित वागणूक व वृत्ती घडण्यासाठी शाळेचे भौतिक व पर्यावरणीय घटकही कारणीभूत होत असतात. विद्यार्थ्यांनीच केलेली शालेय स्वच्छता, बागकाम, इमारतीचे सुंदर रूप हे स्वकष्टाने निर्माण झालेले वातावरण मुलांना रोजच प्रसन्न ठेवू शकते. शाळेतील निरनिराळ्या व्यक्तींमधील संबंध एकमेकांचा सन्मान ठेवणारे, मतांमधील विविधतेचा आदर करणारे असतील तर ही प्रसन्नता अधिक समृद्ध होऊ शकते. आनंदाने शिकणे, आपणहून तसेच एकमेकांशी चर्चा करून शिकणे हाच मूल्यवर्धन कार्यक्रमाचा पाया आहे. जेव्हा शालेय पातळीवर रचनावादी शिक्षणप्रणालीचा अंगिकार केला जातो, तेव्हा अशी समाधानाने शिकण्याची संधी मुलांना रोजच प्राप्त होते. यासाठीच समग्र शाळा दृष्टिकोनात मूल्यवर्धनासाठी रचनावादी शिक्षणप्रणालीचा अवलंब केला आहे.

मूल्यवर्धन कार्यक्रमाची पुढील वाटचाल ही सर्व संबंधितांना घेऊनच होणार आहे. मूल्याधिष्ठित अभ्यासक्रम, मूल्याधिष्ठित वर्गशिक्षण, मूल्याधिष्ठित शाळा आणि मूल्याचरित पालककुटुंबे अशी ही नवी चळवळ असणार आहे. संपूर्ण शाळा हा या चळवळीचा केंद्रबिंदू असणार आहे.

सर्व शिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य आणि स्थानिक नेते यांना आम्ही असे आवाहन करतो की आपण सर्वांनी मिळून शिक्षण मूल्याधारित होण्यासाठी हातभार लावूया. आजचे विद्यार्थी उद्याचे सुजाण नागरिक होण्यासाठी आपापल्या परीने खारीचा वाटा उचलूया.

**शांतिलाल मुथ्था फाउंडेशन**

८ वा मजला, मुथ्था चेंबर्स –२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६
फोन नं: ०२०–६६०५ ०००० info@mutthafoundation.org
www.mutthafoundation.org

**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे**

७०८, आर.बी. कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे, महाराष्ट्र ४११ ०३०
फोन नं: ०२०–२४४७ ८१२२ dir.mscert@gmail.com
www.mscert.org.in

# मूल्यवर्धन™

# समग्र शाळा दृष्टिकोन











## समग्र शाळा दृष्टिकोन

महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांच्या सहकार्याने, महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणात ‘मूल्यवर्धन’ हा नाविन्यपूर्ण आणि उपयुक्त असा कार्यक्रम सुरू झाला आहे. सुरुवातीस हा कार्यक्रम, मुंबई वगळता, महाराष्ट्रातील चौतीस जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदांच्या मराठी शाळांमध्ये, आणि प्रत्येक जिल्ह्यातील एका केंद्रातील सर्व शाळांमध्ये रूजू झाला आहे. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय घटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये रुजावीत व जबाबदार नागरिकत्वाकडे त्यांची पावले पडावीत असा या कार्यक्रमाचा हेतू आहे. हा कार्यक्रम आता महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये सुरू व्हावा, अशी इच्छा, महाराष्ट्राच्या मा. मुख्यमंत्र्यांनी नुकतीच व्यक्त केली आहे व या दिशेने आता वाटचाल होत आहे.

आपल्या सर्वच शाळा ‘मूल्याधिष्ठित’ असाव्यात असे मानून, या मूल्यवर्धन कार्यक्रमात ‘समग्र शाळा दृष्टिकोन’ (Whole School Approach) स्वीकारला आहे. हा दृष्टिकोन आपलासा केल्यास, शाळेतील शिक्षकांकडून मूल्ये शिकविली जात नाहीत, तर ती शाळेचे वातावरण, सर्वसाधारण दैनंदिन व्यवहार, शाळेत वर्षभरात होणारे विविध कार्यक्रम अशा गोष्टींतून, विद्यार्थ्यांना ती सहजपणे आत्मसात होतात. सामान्यपणे शाळेचे वातावरण, कार्यपद्धती आणि ध्येयधोरणे अशी असली पाहिजेत की ज्यात :

- सर्व विद्यार्थ्यांना शाळा सुरक्षित, हवीहवीशी वाटणारी, आधार देणारी, आपल्याला सामावून घेणारी अशी वाटली पाहिजे.
- सर्वच विद्यार्थ्यांना विविध गोष्टी शिकण्यासाठी, वेगवेगळ्या उपक्रमांत भाग घेण्यासाठी व स्वतःमधील गुण–कौशल्ये विकसित व व्यक्त करण्यासाठी भयमुक्त, चिंतामुक्त व तणावमुक्त अशा वातावरणात पुरेशा संधी मिळाल्या पाहिजेत.
- शाळेत कोणतीही हिंसक वा अनैतिक कृती होणार नाही, अशी सर्वांची वागणूक असेल, अन्यायाची दखल घेतली जाईल, अशी शाळेत व्यवस्था असली पाहिजे.
- यांबाबतची ध्येयधोरणे व नियम सर्वांच्या सहभागाने निश्चित करून, त्यांची सर्व–संबंधितांना स्पष्ट कल्पना दिलेली असली पाहिजे.

मूल्यवर्धन कार्यक्रम, गेले काही काळ, अनेक शाळांतून दिला गेला आहे आणि त्या त्या ठिकाणी तो मुलांचा आवडता कार्यक्रम झाला आहे. सध्या हा कार्यक्रम वर्गात घ्यावयाच्या व काही प्रमाणात मुलांनी घरी करायच्या उपक्रमांपुरता मर्यादित आहे. आता ह्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यात येत आहे. हा कार्यक्रम संपूर्ण शाळेच्या स्तरावर घेतला जाणार आहे.






## संपूर्ण शाळा स्तरावर मूल्यवर्धनचे स्वरूप

- शाळेमध्ये अनेक कार्यक्रम होतात; उदा. परिपाठ, उत्सव, सहली, क्रीडामहोत्सव, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन इत्यादी. हे कार्यक्रम मूल्यवर्धनाशी जोडून घेता येतील.
- शाळेमध्ये विद्यार्थी मंडळाची स्थापना करता येईल, जेणेकरून विद्यार्थ्यांना स्वायत्तता, जबाबदारी यांसारखी मूल्ये आत्मसात करायला संधी मिळेल.
- विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणात अनेक प्रौढ व्यक्तींचा परस्परांशी संबंध येत असतो. उदा. शिक्षकवर्ग, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग, पालकवर्ग, शालेय समितीचे सभासद, केंद्रप्रमुख व गावांतील अनेक संबंधित व्यक्ती. शाळेचे ‘समग्र’ रूप या सगळ्यांच्या सहकार्याने व सहभागाने सिद्ध होत असते. या घटकांच्या प्रबोधनाची जबाबदारीही समग्रशाळा दृष्टिकोनात शाळेला उचलावी लागणार आहे.
- मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या विकासात, त्याच्या शालेय स्तरावरील अंमलबजावणीत शाळेशी संबंधित सर्व घटकांची भावनिक गुंतवणूक असावी लागते. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, पण जाणीवपूर्वक दिलेल्या सहमतीतून व सहकार्यातून असे भावनिक बंध निर्माण होत असतात.

## समग्र शाळा दृष्टिकोनातून शाळेसंबंधित घटकांच्या भूमिका

### केंद्रप्रमुख

शालेय प्रगतीबरोबरच शासकीय यंत्रणेशी समन्वय साधण्याची जबाबदारी केंद्रप्रमुखांना पार पाडावी लागते. याच कार्याचा एक भाग म्हणून मूल्यवर्धन कार्यक्रम शाळांमध्ये यशस्वीपणे चालू राहण्यासाठी त्यांना पुढाकार घ्यावा लागतो. प्रत्येक शाळेतील मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेऊन आवश्यकता भासेल तेथे मार्गदर्शन करण्यासाठी व प्रेरणा देण्यासाठी केंद्रप्रमुखांचे योगदान उपयुक्त ठरत आहे. समग्र शाळा दृष्टिकोनातून मुले मूल्यवर्धन कार्यक्रमात सातत्याने रमतील व मूल्ये रुजण्याची संधी त्यांना मिळेल असे वातावरण शाळांमध्ये निर्माण करणे ही सुद्धा केंद्रप्रमुखांची महत्त्वाची भूमिका ठरणार आहे.

### मुख्याध्यापक

मुख्याध्यापक शाळेचा प्रमुख घटक असतो. शाळेच्या व्यवस्थापनाबरोबरच शाळेत बदल घडविण्याचे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणात व त्यांच्या वागणुकीत यथायोग्य परिवर्तन घडविण्याचे नेतृत्व मुख्याध्यापक करीत असतो.

मूल्यवर्धन कार्यक्रमाने आजवरच्या शिक्षणाला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न आरंभला आहे. मुलांमधील मूल्यवर्धनाची जबाबदारी सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांची सांघिक असते. मुख्याध्यापकांना मूल्यवर्धन कार्यक्रमात विविध प्रकारे सहयोग देण्याची गरज आहे. त्यांनी मूल्यवर्धनचा प्रयत्न समजून घ्यायला हवा. त्यावर इतर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात विश्वास निर्माण होईल अशी प्रेरणा द्यायला हवी. या कार्यक्रमाच्या स्वरूपाविषयी, गरजेविषयी शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना माहिती द्यायला हवी. या कार्यक्रमाची प्रगती सातत्याने त्यांच्यापर्यंत पोचवायला हवी. संपूर्ण शाळा मूल्याधिष्ठित बनविण्यास त्यांची मदत होत राहील, असा प्रयत्न करायला हवा. मूल्यवर्धनच्या दृष्टीकोनातून शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे ही मुख्याध्यापकांची महत्त्वाची जबाबदारी असेल.





शाळेच्या एकूण वातावरणात, सर्व व्यक्तींचे म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक इत्यादींचे परस्पर संबंध विश्वासाचे, सौहार्दाचे आणि परस्परांचा सन्मान राखणारे असणे, ही मूल्यवर्धनसाठी आवश्यक बाब आहे. प्रत्येकाचीच वागणूक परस्परांना वेदना देणारी नसणे तर प्रत्येकाला सुख–समाधान देणारी, परस्परांचे लहान–मोठे हित सांभाळणारी असणे हे शाळा पातळीवर खूप महत्त्वाचे आहे. रुजलेली मूल्ये ही वागणुकीतूनच प्रत्ययाला येत असतात. शिवाय परस्परांच्या वागणुकीत सातत्याने दिसून येणारी मूल्याधिष्ठितता ही मुलांच्या वृत्तीतच बदल घडवते. मुले अधिक सामाजिक होतात; त्यांची नेहमीची वागणूकच नागरिकत्वाचे नियम पाळणारी अशी घडते. ती त्यांची सहजप्रवृत्ती बनते. समग्र शाळा दृष्टिकोनात हीच अपेक्षा ठेवलेली आहे. हे परस्पर संबंध विधायक आणि सन्मानाचे राखण्यामध्ये मुख्याध्यापकांना महत्त्वाचे योगदान देता येईल.

### मूल्यवर्धन शिक्षक

मूल्यदूत म्हणून मूल्यवर्धन शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. मूल्यवर्धन उपक्रमांचे आयोजन करताना मुलांकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. कोणते उपक्रम त्यांना आवडतात, कोणत्या उपक्रमांत विद्यार्थी व्यक्तिगत पुढाकार घेतात इत्यादी गोष्टी जाणून घेतल्या पाहिजेत. ज्ञानरचनावादी पद्धतीने, आनंदी वातावरणातून मूल्ये रुजण्यासाठी विविध संधी मुलांना दिल्या पाहिजेत. मूल्यवर्धनमुळे मुलांच्या वर्तनात दिसून येत असलेले बदल, मुलांचा आनंदी प्रतिसाद मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक, पालक यांच्यापर्यंत पोचवायला हवा. तसेच मूल्यवर्धन कार्यक्रम हा विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत नेण्याचा विचार व प्रयत्न केला पाहिजे. याशिवाय मूल्यवर्धन वर्गात वापरलेल्या पद्धती जसे, वर्गनियम बनविणे, सहयोगी रचनांचा वापर अशा गाष्टी मूल्यवर्धन विषयापुरत्याच मर्यादित न ठेवता अन्य विषयांचे अध्यापन करताना देखील त्यांचा वापर करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

मूल्यवर्धन शिक्षकाने मुख्याध्यापक, शाळेतील इतर शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य इत्यादी घटकांना मूल्यवर्धनबद्दलची माहिती दिली पाहिजे. मूल्यवर्धनचा हेतू, मूल्यवर्धनचे ज्ञानरचनावादावर आधारलेले कृतियुक्त उपक्रमांबद्दल माहिती देता येईल. सहयोगी खेळ, सहयोगी अध्ययन पद्धती, विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या संधी, मूल्यवर्धनचे होणारे फायदे, संबंधितांकडून अपेक्षित वर्तणूक व सहकार्य इत्यादी विषयी चर्चा करायला हवी.

### शाळेतील इतर शिक्षक

मूल्यवर्धनचे तास घेणाऱ्या शिक्षकांबरोबरच इतर सर्व शिक्षकांची भूमिका मूल्यवर्धन कार्यक्रमात महत्त्वाची आहे. हा कार्यक्रम नीट समजून घेऊन त्यातील अध्यापन पद्धती जाणून घ्यायला हवी. त्याबाबत परस्परांशी चर्चा करून मूल्यवर्धनसाठी बळकटी मिळेल असे वर्तन ठेवायला हवे. शाळेमध्ये मूल्यवर्धनाचे वातावरण निर्माण होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. पालक सभांमधून या कार्यक्रमाचा आवर्जून उल्लेख करायला हवा. अशा कितीतरी गोष्टी, सर्वच शिक्षक एकत्र येऊन हिरिरीने करू शकतील.

### शाळा व्यवस्थापन समिती

शाळा व्यवस्थापन समिती सदस्य हे शाळा आणि गाव यांमधील दुवा आहेत. एकीकडे, मूल्यवर्धन कार्यक्रम शाळेत प्रभावीपणे राबविला जात आहे किंवा नाही हे त्यांना आवर्जून पाहायचे आहे. त्यासाठी प्रसंगी मूल्यवर्धन उपक्रम कसा घेतला जातो हे वर्गात जाऊनही पाहायचे आहे. दुसरीकडे गावकरी, ग्रामपंचायत व इतर समाज यांना मूल्यवर्धन कार्यक्रम आणि त्यामुळे शाळेत घडून येत असलेले बदल समजून सांगायचे आहेत.